क्र.का.३/संगणक/अभ्यासगट/३५/१२.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - २१/०१/२०१२.

प्रति,
१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक.
३) सर्व सह जिल्हा निबंधक.
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**विषय :-** अभ्यास गटामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुकते विषयी...

नोंदणी व मुद्रांक विभागाच्यावतीने जनतेला दस्त नोंदणीची सेवा देण्याचे कर्तव्य पार पाडले जाते. ही सेवा अधिकाधिक तत्परतेने पार पाडण्यासाठी कामकाजामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. देशातील इतर राज्यातही याप्रमाणे विचारप्रक्रिया व कामकाज पध्दतीमध्ये बदल सुरु आहेत. त्याची प्रत्यक्ष पहाणी करुन व तेथील यंत्रणेचे अनुभव विचारात घेवून, योग्य त्या बाबींचा स्विकार आपल्या राज्यात करण्याचे दृष्टीने, काही राज्यात अभ्यास गट पाठविण्याची बाब विचाराधिन आहे.

या अभ्यास गटांकडून साधारण पुढीलप्रमाणे कामकाज अभिप्रेत आहे -

- ज्या राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांची व कामकाजांची प्रत्यक्ष पहाणी करणे.
- दस्त नोंदणी कार्यप्रणालीमध्ये अंगीकारण्यात आलेली महत्वाची तत्वे / धोरणे व त्यांच्या अंमलबजावणीसाठी वापरलेली तंत्रे याची माहिती घेणे.
- अंमलबजावणीसाठी अधिनियम / नियमामध्ये करण्यात आलेल्या बदलांची व प्रशायकीय बाबींची माहिती घेणे.
- कर्मचारी व जनता यांना आलेले अनुभव समजुन घेणे.
- या सर्व मुद्यांचे अनुषंगाने, शिफारशीसह अहवाल सादर करणे इत्यादी.

तरी सदर पत्र आपल्या अधिनस्त नोंदणी उपमहानिरीक्षक ते वरिष्ठ लिपीक या संवर्गातील (प्रधान मुद्रांक कार्यालयाचे बाबतीत समकक्ष) अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन देवून याप्रमाणे अभ्यास गटामध्ये सहभागी होण्यास इच्छुक कर्मचारी / अधिकारी यांची इच्छापत्रे या कार्यालयास दि.३१/१/२०१२ पर्यंत पाठवावीत. वरिष्ठ लिपीक ते सह जिल्हा निबंधक वर्ग-२ संवर्गातील अधिका-यांची इच्छापत्रे संबंधित सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांचे शिफारशीसह तर सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांची इच्छापत्रे संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचे शिफारशीसह पाठविण्यात यावीत. प्रधान मुद्रांक कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची इच्छापत्रे अपर मुद्रांक नियंत्रक यांचे शिफारशीसह पाठविण्यात यावीत.

शिफारशीसह प्राप्त इच्छापत्रांची छाननी करुन, संवर्गनिहाय आणि प्रादेशिक विभागनिहाय प्रतिनिधित्व मिळेल अशारितीने नावे या कार्यालयाकडून अंतिम करण्यात येतील.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता...